# पुणे विद्यापीठ

परिपत्रक क्र.२३५/२०१३

## पीएच.डी प्रवेश परीक्षेबाबत महत्वाची सुचना

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, पुणे विद्यापीठ अधिसूचना क्र. PGS/Ph.D/8099, दि. ११ ऑक्टोबर, २०१३ अन्वये पात्र विद्यार्थ्यांकडून पीएच.डी अभ्यासक्रमासाठी अर्ज मागविण्यात आलेले आहेत. त्यानुसार पीएच.डी ऑनलाईन प्रवेश परीक्षा पेपर—१ रविवार, दि. १७ नोव्हेंबर, २०१३ रोजी आयोजित करण्यात आलेली आहे.

अ) पेपर—१ चा कालावधी (१२० मिनिटे) दोन तासांचा असेल.

ब) पेपर—१ साठी प्रश्नपत्रिकेचे स्वरूप अधिसूचनेत स्पष्ट करण्यात आलेले असून सदर पेपर हा १०० मार्कांचा असून त्यापैकी ९०% पर्यंत प्रश्न इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषेत असतील व किमान १०% हे इंग्रजीत, इंग्रजी भाषेच्या ज्ञानावर आधारित असतील.

क) पेपर—१ साठीचे प्रवेशपत्र विद्यापीठाच्या संकेतस्थळावर परीक्षेच्या तारखेअगोदर तीन/चार दिवसांपासून उपलब्ध असतील.

गणेशखिंड,पुणे—७ )<br>
संदर्भ :—शै. प्रवेश/ ८२८९ )<br>
दिनांक : २५.१०.२०१३ )

संचालक,<br>
(म.वि.वि.मं.)